महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
Maharashtra Housing & Area Development Authority
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

=====================================================================

जावक क्रमांक - २०५१ / १९ दिनांक :- १० मे, २०२३

प्रसिद्धीपत्रक

# सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नांना 'म्हाडा'चे बळ - मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे

## 'म्हाडा'च्या कोकण मंडळातर्फे ४६४० सदनिका व १४ भूखंड विक्रीसाठी संगणकीय सोडत उत्साहात

मुंबई, दि. १० मे, २०२३ - महाराष्ट्र शासन सर्वांगीण विकासाचे काम करीत आहे. सर्वसामान्यांच्या घरांची स्वनपूर्ती करण्याचे काम महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) माध्यमातून चांगल्या रितीने पार पाडत आहे. म्हाडाच्या विभागीय मंडळांनी गेल्या वर्षभरात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत सुमारे ११,४७९ परवडणारी घरे तसेच १०१ भूखंड सोडतीद्वारे उपलब्ध करून दिली आहेत. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत सुमारे १५ लाख सदनिकांच्या उभारणीस मान्यता मिळाली आहे. म्हाडाच्या सोडतींना सर्वसामान्यांचा मिळणारा प्रतिसाद हे म्हाडाच्या पारदर्शक, लोकाभिमुख कारभाराचे प्रतिबिंब आहे. भविष्यातही अधिकाधिक परवडणारी घरे उपलब्ध करून देत सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नांना 'म्हाडा'ने बळ द्यावे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी आज केले.

'म्हाडा'च्या कोकण मंडळातर्फे ठाणे, पालघर, रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील ४६४० सदनिका व १४ भूखंडांच्या विक्रीसाठी ठाणे पश्चिम येथील डॉ. काशीनाथ घाणेकर सभागृहात आयोजीत संगणकीय सोडतीचा शुभारंभ आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दूरदृष्य प्रणालीद्वारे ऑनलाईन करण्यात आला. यावेळी श्री. शिंदे बोलत होते. ४६४० सदनिका व १४ भूखंड विक्रीच्या सोडतीकरिता एकूण ४८,८०५ प्राप्त झाले.

या कार्यक्रमाला केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री श्री. कपिल पाटील (दूरदृष्य प्रणालीद्वारे), आमदार किसन कथोरे, आमदार श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती वल्सा नायर सिंह, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर, कोकण मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मारोती

मोरे, म्हाडाचे मुख्य अभियंता श्री. शिवकुमार आडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, घर म्हणजे म्हाडा हे नाते सामान्यांच्या मनात घट्ट झाले आहे. म्हाडाची गरजूंना घरे देण्याची कार्यप्रणाली कौतुकास्पद आहे. सोडतीला मिळालेला प्रतिसाद पाहिला तर म्हाडावरील विश्वास सिद्ध होतो. आजच्या सोडतीत घर मिळालेल्या लाभार्थ्यांना म्हाडाने लवकरात लवकर घरांचा ताबा द्यावा. जेणेकरून त्यांचा गृहप्रवेश लवकर होऊ शकेल. सदर सोडतीच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजनेत (शहरी) अत्यल्प उत्पन्न गटासाठी खोणी, शिरढोण, विरार बोळींज, गोठेघर येथे सदनिका उपलब्ध करून देत असून त्यासाठी केंद्राची मंजुरी मिळाली आहे. केंद्राचे दीड लाख, आणि राज्य शासनाचे एक लाख अनुदान त्यासाठी मिळणार आहे. या माध्यमांतून अनेकांचे घराचे स्वप्न साकार होणार आहे.

मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, दिवस असो किंवा रात्र, चोवीस तास राबणारे सरकार अशी आमची ओळख आहे. नागरिकांची कामे त्वरीत व्हावीत आणि त्यांना खेटे मारावे लागू नयेत, यासाठी आम्ही प्रत्येक जिल्ह्यांत मुख्यमंत्री सचिवालये सुरु केली आहेत. शासन आपल्या दारी उपक्रम सुरू केला आहे. मंत्रालयात त्रास होऊ नये म्हणून अद्ययावत सेन्ट्रल रजिस्ट्री सुरू केली आहे. या माध्यमातून समाजाभिमुख, लोकाभिमुख कारभार आम्ही करत आहोत. म्हाडाला नियोजन प्राधिकरणाचा दर्जा प्रदान करण्यात आल्यामुळे ११४ अभिन्यासातील इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पांना बृहन्मुंबई क्षेत्राच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार व महानगरपालिकेच्या विकास आराखड्याच्या अधीन राहून नकाशा मंजुरी, बांधकाम परवानगी जारी करणे, भोगवटा प्रमाणपत्र जारी करणे आदी कामांनी वेग पकडला आहे. म्हाडाकडे नायगांव (दादर), ना.म.जोशी मार्ग- परळ आणि वरळी येथील सुमारे ९२ एकर क्षेत्रावरील ब्रिटिशकालीन बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाची जबाबदारी सोपविण्यात आली असून आशिया खंडातील सर्वात मोठा नागरी पुनरुत्थान प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून १५५९३ पुनर्वसनगाळयां व्यतिरिक्त ८१२० अतिरिक्त गाळे तयार होणार आहेत.

यावेळी केंद्रीय पंचायतती राज राज्यमंत्री श्री. कपिल पाटील म्हणाले की, देशाचे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या सर्वांसाठी घर या संकल्पनेची पूर्तता करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे, याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. येत्या काळात प्रधानमंत्री आवास योजना आणि 'म्हाडा'च्या माध्यमातून राज्यातील सर्व बेघरांना घर मिळवून देण्याचे काम महाराष्ट्र शासनाकडून होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

म्हाडातर्फे वेबकास्टिंगच्या माध्यमातून सदर सोडतीचे करण्यात आलेले थेट प्रक्षेपण सुमारे ४७,१९४ नागरिकांनी बघितले.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अनिल डिग्गीकर यांनी केले. सोडत यशस्वीतेसाठी कार्यकारी अभियंता श्री. उदय मराठे, श्री. संदीप भदाणे, श्री. संजय वराडे, उपमुख्य अधिकारी श्रीमती कल्पना पवार, मुख्य लेखाधिकारी श्रीमती नितळ लव्हाळे, मिळकत व्यवस्थापक श्री. स्वप्नील नाईक, श्री. अवधूत बेलणेकर, श्री. संजय माने आदीसंह अधिकारी - कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा




महाराष्ट्र शासन
मुख्यमंत्री


KB
KONKAN BOARD
Office of Hon.Ek...
Office of Hon.Eknath Shinde j
Hon.Chief Minister of Maharashtra
Kapil Patil Minister of State for Panchayat Raj
Unmute
Start Video
Security
Participants
Chat
Share Screen
Record
Show Captions
Reactions
Apps




प्रधान मंत्री
आवास योजना - शहरी
Pradhan Mantri Awas Yojana - Urban


म्हाडा
MHADA
प्रधान मंत्री
आवास योजना - शहरी
Mantri Awas Yojana - Urban
for PMAY (Urban) in Maharashtra


Name of Member
ARJUN NIVRUT
SACHIN NANDK
HOLE
OMKAR VI
SMT. SH
SMT. I
Start Lott




म्हाडा
MHADA
प्रधान मंत्री
आवास योजना - शहरी
Pradhan Mantri Awas Yojana - Urban
MHADA - Nodal Agency for PMAY (Urban) in Maharashtra


START